ePaper

अर्थसंकल्प:करपात्र उत्पन्नाची रक्कम 5 हून 7 लाखांवर!



वर्ष - 6 । अंक - 287 UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- कसबा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीत उमेदवारांची चढाओढ!
- बंडखोरीची 'मशाल' पेटणार?
- CM शिंदेंमुळे राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर?

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 2 फेब्रुवारी 2023 पिंपरी-चिंचवड आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

# साहित्य खरेदीत गैरप्रकार?

## » माजी उपमहापौर तुषार हिंगे यांचा आरोप : त्रयस्थ यंत्रणेमार्फत लेखापरीक्षण करा

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडून वैद्यकीय विभागासाठी व वायसीएम रुग्णालयासाठी झालेल्या उपकरणे व साहित्य खरेदीचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत लेखापरिक्षण करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी राज्य शासनाकडे केली**

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात हिंगे यांनी म्हटले आहे की, महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या रुग्णालय, दवाखाने यांच्यासाठी आवश्यक सर्व यंत्रे, अत्याधुनिक उपकरणे, साहित्य सामुग्री मध्यवर्ती भांडार विभागामार्फत केली जाते.

गेल्या काही वर्षातील मध्यवर्ती भांडार विभागामार्फत मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली आहे. यामध्ये वैद्यकीय विभागाची चार नवीन रुग्णालये सुरू झालेली असताना या रुग्णालयाला अधिकाधिक उपकरणे व साहित्य सामुग्री उपलब्ध करून देणे अभिप्रेत आहे. तरी देखील फक्त वायसीएम या रुग्णालयाकरिता सर्वाधिक उपकरणे व साहित्य खरेदी केली जात आहे.





> वायसीएम रुग्णालयासाठी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत होणारी खरेदीप्रक्रिया गैर पध्दतीने व कंत्राटदारांना डोळ्यासमोर ठेवून राबविली जात असल्याचा संशय बळावतो. राज्य शासनाकडून प्रशासक नियुक्त केलेले आहे. हा सर्व कारभार राज्य सरकार मार्फत सुरू असल्याचे भासवून राज्य सरकार आणि भाजप पक्षाची बदनामी या सर्व प्रकारातून होत आहे. वायसीएम रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या सर्व उपकरणे, साहित्य व इतर निविदाप्रक्रियेची त्रयस्थ संस्थेमार्फत सखोल चौकशी आणि विशेष लेखापरिक्षण व्हावे. यामध्ये दोषी आढळणा-या अधिकारी व ठेकेदार यांच्याविरुध्द कठोर कारवाई करावी.
>
> - तुषार हिंगे, माजी उपमहापौर.

या पैकी काही उपकरण खरेदीमध्ये झालेले गैरप्रकार समोर आल्यानंतर या निविदा रद्द करण्याची नामुष्की मध्यवर्ती भांडार विभागावर आली. साहित्य किंवा उपकरणे ही निविदेतील स्पेशिफिकेशननुसार खरेदी केले जात नाहीत. खरेदी करून पुरवठा झाल्यानंतर या उपकरणांचा रुग्णांसाठी उपयोग केला जात नाही. यासारख्या अनेक तक्रारी वायसीएम रुग्णालयासाठी होणा-या खरेदीसंदर्भात आहेत. तरी देखील मध्यवर्ती भांडार विभाग आणि वायसीएम रुग्णालय यांचे अधिकारी संगनमताने चुकीचा कारभार करत आहेत.

# मध्यमवर्गीय,शेतकरी,गोरगरीबांनान्यायदेणाराअर्थसंकल्प!

## » आमदार महेश लांडगे : क्रयशक्ती वाढेल, विकासाला चालना

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्पन्नावरील कर सवलतीची मर्यादा वाढवून देशातील कोट्यवधी कुटुंबाना आर्थिक स्थैर्याची ग्वाही दिल्याबद्दल अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासातील सर्वसामान्य जनतेचा सहभाग सुनिश्चित केला आहे, अशा शब्दांत भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत केले.**

नवीन कर प्रणाली अंतर्गत सात लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही, त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या हाती पैसा शिल्लक राहून त्याची



क्रयशक्ती वाढेल व विकासास चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साखर कारखान्यांनी २०१६ -१७ पूर्वी शेतकऱ्यांना ऊस बिलापोटी दिलेले पैसे खर्च समजण्याची तरतूद करून साखर कारखान्यांच्या आयकराच्या प्रश्नावर कायमचा तोडगा काढला आहे, असेही त्यांनी नमूद केले .

आपल्या एक तास २७ मिनिटांच्या भाषणात केंद्रीय अर्थमंत्र्यांनी गरिबांसाठी मोठी घोषणा केली. गरिबांना मोफत धान्य देण्याची योजना आणखी एक वर्ष सुरू ठेवण्याचे जाहीर करून मोदी सरकारने पालकत्वाच्या जबाबदारीचे भान जपले, असे ते म्हणाले.

या वर्षात ५० नवीन विमानतळ आणि हेलिपॅडही बांधले जातील. तरुणांसाठी ३० आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. रेल्वेच्या खर्चासाठी २.४० लाख कोटी रुपये, सूक्ष्म , लघु आणि माध्यम उद्योगांना ( एमएसएमई ) ना ९ हजार कोटींची पतहमी आणि ऊर्जा सुरक्षेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची हमी यांमुळे विकासाच्या गतीला चालना मिळणार असून खऱ्या अर्थाने अमृतकाळाचा आशादायक आरंभ झाला आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. सात लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नास करमुक्ती, ६० लाख रोजगारांच्या संधी, गरिबांसाठी

> समावेशक विकास, शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचणे, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक, क्षमतांचा विकास करणे, हरित विकास, युवा शक्ती, आर्थिक क्षेत्र या सात प्रमुख उद्देशाने केंद्र सरकार काम करीत आहे. ही बाब सामान्य नागरिकांच्या दृष्टीने समाधानकारक आहे. तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने आम्ही या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो.
>
> - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



मोफत धान्य योजनेस मुदतवाढ, आदिवासींच्या विकास योजनांसाठी १५ हजार कोटींची तरतूद, पारंपरिक कारागीरांच्या कौशल्याचा सन्मान, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी डिजिटल पायाभूत सुविधा, ज्येष्ठ नागरिकांच्या बचत मर्यादेत वाढ, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा संकल्प, पर्यटनवृद्धीस प्रोत्साहन, गरीबांना हक्काचे घर देणाऱ्या पंतप्रधान घरकुल योजनेसाठी ७९ हजार कोटींची भरीव तरतूद आदी प्रस्ताव केंद्र सरकारच्या प्रामाणिक सामाजिक जाणिवेची आणि संवेदनशीलतेची साक्ष देतात, असे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

## शॉर्ट न्यूज



### "मदर टीचर" दमयंती खान यांचे निधन

**पिंपरी :** तळेगाव दाभाडे येथील जुन्या पिढीतील आदर्श शिक्षिका दमयंती आफताब खान (वय ८५ वर्षे) यांचे मंगळवारी (दि. ३१) तळेगाव दाभाडे येथे हृदय विकारामुळे निधन झाले. मावळ तालुक्यात त्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत ३९ वर्षे अध्यापन केले. १९९४ साली जागतिक आरोग्य संघटनेच्या अमेरिकेतील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या उर्सेगाव प्राथमिक शाळेच्या भेटी दरम्यान मुख्याध्यापिका दमयंती खान यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांना 'मदर टीचर' म्हणून गौरविले होते. पत्रकार अमिन खान, आकुर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते हमीद खान आणि भोसरीतील माजी नगरसेविका उर्मिला खाडे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# कसबा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीत उमेदवारांची चढाओढ!

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



कसबा मतदारसंघासाठी सध्या भाजपसह महाविकास आघाडीत चढाओढ सुरु असल्याचं चित्र दिसून येत आहे. एकाच जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेनेने दावा केला आहे. तिन्ही पक्षाच्या इच्छुक उमेदवारांची लांबलचक यादी तयार झाली आहे. त्यामुळे कसब्यात आता महाविकास आघाडीकडून कोणाला नेमकी उमेदवारी मिळते कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

निवडणूक जाहीर होण्याआधी पासूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली पाटील यांनी इच्छुक असल्याचं बोलून दाखवलं. त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पाठोपाठ शिवसेनेनेही इच्छुक असल्याचं बोलून दाखवलं आहे. त्यात आता राष्ट्रवादीच्या डझनभर इच्छुक उमेदवारांची यादी आहे.

शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची यासंदर्भात पुण्यात बैठक झाली. या बैठकीत एकूण दहा इच्छुकांची नावं प्रदेशाकडे पाठवण्याचा निर्णय झाला आहे. कसबा मतदारसंघ जरी भाजपचा पारंपारिक मतदारसंघ असला तरी या मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेसची मोठी ताकद आहे. त्यात कसबा पेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून अंकुश काकडे, अण्णा थोरात, रवींद्र माळवदकर, गणेश नलावडे, वनराज आंदेकर, रुपाली पाटील, शिल्पा भोसले, दत्ता सागरे या प्रमुख नावासह एकूण 10 इच्छुकांची नावं आहेत. त्यांची नावं प्रदेश कार्यलयात पाठवण्यात आली आहेत. महाविकास आघाडीचे तिनही पक्ष सध्या कसब्यातील जागेवर दावा करत आहेत. कसब्याच्या जागेसाठी काँग्रेसकडूनही जोरदार तयारी सुरु झाली. काँग्रेसमध्येही अनेक इच्छुक उमेदवारांची यादी मोठी आहे. आमदार संग्राम थोपटे यांनी 16 जणांच्या ऑनलाईन मुलाखती घेतल्या गेल्या. यात अरविंद शिंदे, रविंद्र धंगेकर, बाळासाहेब दाभेकर, कमल व्यवहारे, नीता रजपूत, संगिता तिवारी, विजय तिकोणे आणि इतर इच्छुकांचा समावेश आहे.

# महिला उद्योजिकांसाठी 'घे भरारी'

## पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच प्रदर्शन : 80 पेक्षा जास्त नवउद्योजकांचा सहभाग

।पिंपरी ।महाईन्यूज ।



नवव्यावसायिकांना आणि स्त्री उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी घे भरारी ने एका भव्य प्रदर्शन प्रथमच चिंचवड आकुर्डी येथे आयोजित केले आहे. दि. ३/४/५ फेब्रुवारी २०२३ रोजी हे प्रदर्शन सिजन बॅक्वेट हॉल, मुंबई-पुणे हायवे काळभोरनगर, चिंचवड येथे होणार आहे. सकाळी 11 ते रात्री 9 या वेळात नागरिकांनी या प्रदर्शनाला जरूर भेट द्यावी, असे आवाहन राहुल कुलकर्णी आणि नीलम उमराणी एदलाबादकर यांनी केले आहे.फेसबुक वर १ लाख ८० हजार वरून छोटे व्यावसायिक यात सामील झाले आहेत. ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतीने पुणे आणि देशभरातील लोक याला जोडले गेले आहेत.या प्रदर्शनात 80 पेक्षा जास्त छोटे व्यावसायिक व महिलांनी भाग घेतला आहे. उत्तमोत्तम दागिने, कपडे, परफुम्स ,कुर्ती, पर्सेस, पादत्राणे, साबणे, तांब्याच्या वस्तू, हस्तकलेच्या अनेक वस्तू ,पिशव्या, टेराकोटा वस्तू, खाद्यपदार्थ असे अनेक स्टॉल येथे बघायला मिळतील.

### नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी भेट द्या...

एक उत्कृष्ट 'वीकेंड' घालवण्यासाठी हे प्रदर्शन नक्कीच उत्साहवर्धक ठरेल यात शंकाच नाही. अनेक व्यावसायिक त्यांच्या व्यवसायात त्यांनी मिळवलेले यश आणि त्यांच्या घे भरारीच्या साथीने झालेला प्रवास आपल्याला बघायला मिळेल. तरी असे प्रदर्शन चुकवू नये असा होणार आहे. या सर्व छोट्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी या प्रदर्शनाला सर्वांनी जरूर भेट द्यावी. व्यावसायिकांनी व्यावसायिकांसाठी तयार केलेल्या या सोहळ्याला जरूर उपस्थित राहून आपल्यामधील व्यावसायिक तयार करण्याच्या ह्या कामात नक्की सामील व्हावे, असे आवाहन राहुल कुलकर्णी आणि नीलम उमराणी एदलाबादकर यांनी केले आहे.




## कसबा काँग्रेसला, चिंचवड राष्ट्रवादीला, तर

# बंडखोरीची 'मशाल' पेटणार?

### » पुणे जिल्ह्यात शिवसेना ठाकरे गटाला संधीची प्रतीक्षाच? : 21 पैकी एकाही मतदार संघात प्रतिनिधीत्व नाही

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीचा प्रयोग केल्यामुळे शिवसेनेत दोन गट निर्माण झाले. ठाकरे गट आणि शिंदे गट अशी दुफळी झाली आणि महाविकास आघाडीचे सरकार कोसळले. पण, त्यापूर्वीच २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यात क्षमता असतानाही एकही आमदार निवडून आला नाही. आता पोटनिवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीकडून 'मशाल' पेटवण्याची संधी असतानाही, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला २०२४ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.**

पुणे जिल्हयात जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, मावळ, चिंचवड, पिंपरी , भोसरी, वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कँटॉन्मेंट व कसबा पेठ या विधानसभा मतदार संघांचा समावेश आहे. या भागांमध्ये शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा मतदार आहे. मात्र, २०१९ मध्ये शिवसेना जिल्ह्यातून हद्दपार झाली. त्यामुळे कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून इच्छुकांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या.




दरम्यान, चिंचवड आणि कसबा या ठिकाणची निवडणूक बिनविरोध करण्याबाबत भाजपाचा प्रस्ताव होता. मात्र, मी निवडणूक कोल्हापूर, पंढरपूर, नांदेड मधील पोटनिवडणुकीचा दाखला देत चिंचवड आणि कसबा पोटनिवडणूक लढविण्यावर मी ठाम असल्याचे सांगत चिंचवडमधून निवडणूक लढविण्यासाठी माझ्याकडे आत्तापर्यंत 8 ते 9 जणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी म्हणून उमेदवारी मागितली आहे, अशी माहिती राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली आहे. त्यामुळे ही निवडणूक स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या प्रस्तावानुसार 'घड्याळ' चिन्हावर लढवण्यात येईल, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

तसेच, कसबा मतदार संघावर महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेसने दावा केला आहे. या मतदारसंघावर भारतीय जनता पक्षाचे अनेक वर्षे वर्चस्व असले तरीही पोटनिवडणुकीत काँग्रेसला संधी मिळाल्याचा इतिहास आहे. सन १९९१मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या वसंत थोरात यांनी भाजपचे गिरीष बापट यांचा पराभव केला होता. आता या इतिहासाची पुनरावृत्ती घडवण्यासाठी इच्छुकांनी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांना साकडे घातले आहे.

### बंडखोरी रोखण्याचे महाविकास आघाडीला आव्हान...

**» याउलट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख अॅड.सचिन भोसले, राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी महाविकास आघाडीची उमेदवारी मिळावी. याकरिता प्रस्ताव पक्षश्रेष्ठींना पाठवले आहेत. खासदार संजय राऊत यांनी चिंचवडची जागा शिवसेनेला द्यावी, अशी मागणी गेल्या आठवड्यातच केली होती. चिंचवडमध्ये शिवसेनेला (ठाकरे गट) मानणारा वर्ग आहे. या मतदार संघातून महापालिका निवडणुकीत ६ नगरसेवक निवडून आले होते. याहून जगताप यांचे प्रतिस्पर्धी राहुल कलाटे यांनी २०१४ ची निवडणूक शिवसेनेच्या तिकीटावर आणि २०१९ ची निवडणूक पाठिंब्याने लढवली आहे. त्यामुळे या मतदार संघात 'मशाल' चिन्हावर निवडणूक लढवावी, असा दावा केला होता. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाना काटे, भाउसाहेब भोईर, मोरेश्वर भोंडवे, मयूर कलाटे असे दिग्गज इच्छुक आहेत. तसेच, महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून राहूल कलाटे उमेदवारी मागत आहेत. तिकीट एकालाच मिळणार आहे. त्यामुळे "अभी नहीं तो कभी नहीं" या भावनेतून महाविकास आघाडीत बंडखोरीची शक्यता जास्त आहे.**

---

# मिळकतकर वसुलीसाठी ५२६ मिळकती सील

### » प्रशासनाचा दणका : वसुलीसाठी हजार कोटींचे उद्दीष्ठ

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या कर संकलन विभागाने सहाशे कोटींची वसुली केली आहे. थकबाकीदार सदनिका, व्यावसायिक गाळे जप्तीची मोहीम सुरू आहे. मालमत्ता कर थकबाकी न भरल्यामुळे ५२६ मालमत्ता सील केल्या आहेत. आतापर्यंत ८ हजार ८३६ जप्तीची पत्रे तयार केली आहेत.**



पिंपरी- चिंचवडमधील महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने जानेवारी महिन्यातच विक्रमी कर वसूल केला आहे. १ लाख ६० हजार निवासी मालमत्ताधारकांकडे ४५० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. शहरात ५ लाख ९१ हजार मिळकतींची नोंद आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने हजार कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. मोहिमेत मोठ्या प्रमाणात सदनिका, व्यावसायिक गाळे जप्त केले जात आहेत. थकबाकी न भरल्यामुळे ५२६ मालमत्ता सील केल्या आहेत. आतापर्यंत ८ हजार ८३६ जप्ती अधिपत्र तयार केली आहेत. तसेच ३ हजार २२५ मालमत्तांवर जप्ती कारवाई केली आहे. जप्तीनंतर २ हजार ८१२ मालमत्तांचा कर वसूल झाला आहे. वसूल झालेली कराची रक्कम ४३ कोटी ६८ लाख २१ हजार २३२ एवढी आहे. १० हजार, २५ हजार, ५० हजारापुढे मुळकर व थकबाकी असलेल्या मालमत्तांना जप्ती पूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे.

**" दहा महिन्यांत ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता कर वसूल झाला आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ संपण्यासाठी आता फेब्रुवारी व मार्च असे दोन महिने शिल्लक आहेत. या दोन महिन्यात उर्वरित मालमत्ता करधारकांकडून कर वसुलीचे नियोजन महापालिकेने केले आहे.**

**– मा. शेखर सिंह, आयुक्त.**

**" १० हजार रुपये आणि २५ हजार रुपयांच्या पुढील मालमत्ता जप्ती पूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. सर्व जप्ती अधिपत्रांची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे. ज्या निवासी मालमत्तांकडे एक लाखापेक्षा जास्त थकबाकी आहे, त्यांचे नळ कनेक्शन तोडण्यात येत आहे.**

**– नीलेश देशमुख, सहायक आयुक्त.**

## संपादकीय »

# पण आणि परंतु

***बडय़ा तंत्रज्ञान कंपन्यांची कर्मचारी कपात, पतपुरवठय़ावर नियंत्रणे, चालू खात्यातील तूट अशी आपल्या अर्थव्यवस्थेपुढील अनेक आव्हाने आर्थिक पाहणी अहवाल नोंदवतो..***

अर्थसंकल्पाच्या एक दिवस आधी आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्याची प्रथा आहे. त्यानुसार सरत्या आर्थिक वर्षांचा अहवाल मंगळवारी सादर झाला. अर्थसल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांचा हा दुसरा आर्थिक पाहणी अहवाल. गतसाली याच दिवशी, म्हणजे जानेवारी महिन्याच्या अखेरच्या दिवशी, सादर केलेल्या आपल्या आर्थिक पाहणी अहवालात देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती ८.५ टक्के असेल असे भाकीत त्यांनी वर्तवले होते. नंतर ते सात टक्क्यांपर्यंत खाली आणले गेले आणि आज आर्थिक पाहणी अहवालानुसार अर्थविकास ६ ते ६.५ टक्के या गतीने होईल असे त्यांनी सांगितले. गतसालच्या आर्थिक पाहणी अहवालाविषयी ‘लोकसत्ता’च्या संपादकीयाचे शीर्षक ‘माफक आणि मर्यादित’ असे होते. विविध क्षेत्रांतील आर्थिक सुधारणांबाबत त्यात व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षा, त्यांच्या प्रगतीचे लक्ष्य, आगामी उद्दिष्टे इत्यादींबाबत त्या पाहणी अहवालाने ठेवलेल्या अपेक्षा माफक आणि मर्यादित होत्या. प्रत्यक्षात त्याही पूर्णत्वास येऊ शकल्या नाहीत. आर्थिक पाहणी अहवालात अपेक्षित गतीपेक्षा प्रत्यक्षातील अर्थगती अधिक माफक आणि मर्यादित झाली. असे होते. त्या पार्श्वभूमीवर यंदा सादर करण्यात आलेल्या आर्थिक पाहणी अहवालाचे वर्णन ‘पण आणि परंतु’ असे करणे अन्यायकारक ठरणार नाही. यात सर्वात महत्त्वाची आहे ती चालू खात्याची तूट. म्हणजे करंट अकाऊंट डेफिसिट. आयात आणि निर्यात यांतून मिळणाऱ्या उत्पन्नातील तफावत म्हणजे चालू खात्यातील तूट. निर्यातीच्या तुलनेत आयात अधिक असेल तर ही तूट वाढत जाते. कारण आयात होत असलेल्या उत्पादनांचे मोल डॉलर या जागतिक चलनामध्ये द्यावे लागते. त्याच वेळी आपण निर्यात करतो त्यातून मिळणारे उत्पन्नदेखील डॉलरमध्येच मिळते. याचा अर्थ असा की निर्यात अधिक असल्यास डॉलर्स अधिक जमतात आणि हेच उलट असेल तर आयात मालासाठी सरकारी खात्यातील डॉलर्स अधिक मोजावे लागतात. यांतील फरक म्हणजे ही तूट. ती कमी करायची तर अधिकाधिक निर्यातजन्य उत्पादने देशात तयार होणे आवश्यक. त्याच वेळी त्याच प्रमाणात आयातही कमी होणे गरजेचे. तथापि गेल्या काही तिमाहींत आपली निर्यात तितक्या प्रमाणात वाढत नसून त्याच वेळी आयातीत मात्र भरमसाट वाढ होताना दिसते. यास सर्वाधिक जबाबदार आहे ते खनिज तेल. खनिज तेलाच्या दरात वाढ झाली की प्रत्यक्ष आयात वस्तूंत वाढ न होताही आपणास अधिक डॉलर्स खर्च करावे लागतात.

# जेवढी ऐपत तेवढे शिक्षण हे वास्तव बदलावे लागेल!






‘प्रथम फाउंडेशन’च्या भारतीय प्राथमिक शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेणाऱ्या विभागाच्या म्हणजेच ‘असर’च्या (ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) अहवालाच्या पार्श्वभूमीवर सध्या ‘शिक्षण प्रक्रिया’ व ‘शिक्षण व्यवस्था’ या विषयांवर चर्चा सुरू आहे. कोविड साथ आणि टाळेबंदीमुळे या अहवालात दोन वर्षे खंड पडला होता. त्यानंतर यंदा हा अहवाल सादर करण्यात आला आहे. राज्यातील आठवीचे काही विद्यार्थी इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांइतके ‘कच्चे’ असल्याचे ‘असर’च्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. यानिमित्ताने ‘शिक्षण प्रक्रिया’ व ‘शिक्षण व्यवस्था’ यातील उणिवांची चर्चा होत आहे, ही जमेची बाजू आहे. ‘असर’सारखे अहवाल आपल्याला ‘किमान गुणवत्तेचे प्राथमिक शिक्षण’ या विषयावर चर्चा करायला भाग पाडतात. या पार्श्वभूमीवर ‘स्वानुभव’ या पात्रता निकषावर हा लेख लिहिण्याचे धाडस मी करत आहे. ज्या काळात माझा शालेय पातळीवरचा प्राथमिक शिक्षणाचा प्रवास सुरू झाला, त्या वेळी देशात ‘मंडल-कमंडल’, ‘आर्थिक उदारीकरण’, ‘जागतिकीकरण’ अशी धामधूम सुरू होती. मराठी शाळांना बरे दिवस होते. महापालिका शाळेत जाणे म्हणजे ‘कमीपणा’ मानला जात नव्हता. माझ्या वडिलांनी सुरुवातीची १० वर्षे तत्कालीन कुलाबा (रायगड) जिल्हा परिषदेतील शाळेत आणि नंतर तब्बल २७ वर्षे मुंबई महापालिकेच्या वेगवेगळ्या शाळांत शिक्षक म्हणून सेवा बजावली. त्यामुळे घरात शिक्षण क्षेत्र- व्यवस्था- प्रक्रिया याला पूरक चर्चा होत असत. खासगी मराठी-इंग्रजी माध्यमांच्या शाळेचा पर्याय उपलब्ध असतानाही वडिलांनी शिक्षकाच्या भूमिकेतून महापालिकेच्या मराठी शाळेचा पर्याय निवडला. त्या वेळी त्यांचे इतर सहकारी शिक्षक बहुतेककरून आपल्या मुला-मुलींना खासगी मराठी-इंग्रजी अनुदानित- विनाअनुदानित शाळांत दाखल करत. तरीसुद्धा वडिलांनी माझ्या बाबतीत ‘महापालिका- मराठी माध्यम शाळा’ हा निर्णय घेतला!

महापालिकेच्या शाळेत असल्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणात आपण कमी पडत आहोत, असे कधी वाटले नाही. समवयस्क मित्र-नातलग खासगी मराठी-इंग्रजी शाळेत जात असताना कोणताही न्यूनगंड माझ्यात निर्माण झाला नाही. वाचन-लेखन कौशल्ये, भाषण-संभाषण कौशल्ये, अभ्यासेतर उपक्रम यामुळे पुढील शैक्षणिक वाटचालीत उपयोगी ठरणाऱ्या अंगभूत गुणांची ओळख व पायाभरणी मुंबई महापालिकेच्या शाळेतच झाली. वडील निवृत्त झाल्यानंतर पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखल झालो. उसासारखे नगदी पीक व सहकारी साखर कारखानदारी यामुळे बऱ्यापैकी सुबत्ता असलेल्या भागात माझे गाव आहे. देशाच्या माजी केंद्रीय कृषिमंत्र्यांचा हा पारंपरिक लोकसभा मतदारसंघ. जिल्हा परिषदेच्या शाळेतील या नव्या वातावरणाशी जुळवून घेणे सुरुवातीला फार कठीण गेले. पाठ्यपुस्तकातील ‘प्रमाण’ मराठीशी जुळवून घेताना इथल्या शेतकऱ्यांच्या मुलांचा उडणारा गोंधळ मी पहिल्यांदा पाहत होतो. त्यामुळे त्यांचा शाळेत येण्याचा उद्देश केवळ ‘साक्षर’ होणे हाच! वाचन-लेखन-अभ्यास ही प्रक्रिया काही मुलांपुरतीच मर्यादित. मात्र गावातील प्रत्येक मूल शाळेत ‘दाखल’ होईल याची काळजी घेतली जाई. शाळा महापालिकेची असो वा जिल्हा परिषदेची शिक्षक आपली जबाबदारी झटकत आहेत, असे कुठे वाटत नव्हते. खासगी शिकवणी किंवा ‘कोचिंग क्लास’सारख्या समांतर शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून राहण्याची वेळ आली नव्हती.


हा पर्याय पुढे मुंबईत परतल्यावर, ‘माध्यमिक स्तरावर’ खासगी अनुदानित शाळेकडूनच माझ्यापुढे आला. अ, ब, क, ड या शिक्षण व्यवस्थेतील नव्या वर्गव्यवस्थेची ओळख मला पहिल्यांदाच झाली. ‘कोचिंगचा’ पर्याय मी नाकारला. तसे अपयश आलेही. पहिल्यांदाच शाळा कुठे तरी कमी पडत आहे, हे जाणवले. अपयशाचे संधीत रुपांतर करणे मला जमले, पण इतरांना शिक्षण प्रक्रियेच्या परिघाबाहेर फेकण्यास हे एक अपयश पुरेसे ठरले.

# चिनी अर्थव्यवस्थेचे ‘नवे’ वळण

**करोना निर्बंध उठवल्यानंतर प्रथमच, चिनी नववर्ष धडाक्यात साजरे होते आहे; या नववर्षांत घडणाऱ्या घटना चीनची अर्थव्यवस्था भविष्यात नक्की कोणते वळण घेणार हे ठरवतील.**

गेली काही दशके चीनची अर्थव्यवस्था अमेरिकन अर्थव्यवस्थेइतकीच, जागतिक अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी होती; अजूनही आहे. साहजिकच त्या अर्थव्यवस्थेतील घडामोडींचे परिणाम भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर होतात. त्यामुळे त्यांची आपणदेखील दखल घेणे गरजेचे.

काही दिवसांपूर्वी २०२२ सालासाठी चीनच्या स्थूल अर्थव्यवस्थेशी संबंधित दोन नीचांकी आकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे महत्त्व दोन कारणांसाठी. एक, गेल्या काही दशकातील चिनी अर्थव्यवस्थेच्या प्रवासात असे नीचांक प्रथमच साधले गेले आणि दुसरे, हे आकडे अपवादात्मक नसून ते भविष्यवेधी ‘ट्रेंडसेटर’ असतील असे अंदाज केले जात आहेत. यापैकी पहिला आकडा आहे चीनच्या जीडीपीबद्दल. १९७६ साली डेंग यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणानंतर २०२२ सालात प्रथमच चीनचे ठोकळ उत्पादन फक्त



३ टक्के इतक्या कमी दराने वाढले. करोनाचे पहिले वर्ष अपवाद मानले तर हाच ऐतिहासिक नीचांक. दुसरा आकडा आहे चीनच्या लोकसंख्येबाबतचा. १९६१ नंतर २०२२ सालात पहिल्यांदा चीनची लोकसंख्या घटू लागली आहे. २०२२ सालात पहिल्यांदा चीनमधील मृत्यू जन्मलेल्या बाळांपेक्षा ८ लाखांनी जास्त होते. या प्रक्रिया एकेकटय़ा घडल्या असत्या तरी त्या गंभीरच होत्या; त्या आता एकाच वेळी घडत असल्यामुळे त्यांचे गांभीर्य काही पटींनी वाढू शकते. या लेखात आपण चीनमधील या दोन प्रक्रियांची थोडक्यात माहिती घेणार आहोत.

चीनचे ठोकळ उत्पादन

चीनचे ठोकळ उत्पादन गेल्या ४० वर्षांत सरासरी ९ टक्क्यांनी वाढले. ते असे एका सरळ रेषेत, याच गतीने वाढू शकणार नाही हे उघड होते. कोविड महासाथ, अगदी मोठय़ा औद्योगिक शहरांमध्ये कडक लॉकडाऊन आणि ‘शून्य करोनाबळी’ धोरण यामुळे चीनची जीडीपी दरवाढ मंदावणार तर होतीच, पण २०२२ मधील नोंदलेली ३ टक्के दरवाढ ही भविष्याचे सूतोवाच असू शकते. याची कारणे चीनच्या अर्थव्यवस्थेत आहेत तशी अर्थव्यवस्थेबाहेर देखील आहेत . चिनी अर्थव्यवस्थेच्या नेत्रदीपक घोडदौडीसाठी लागणारे महाप्रचंड भांडवल मोठय़ा प्रमाणावर कर्ज उभारणीतून उभे केले गेले. केंद्र व राज्य सरकारे, म्युनिसिपालिटी, सार्वजनिक आणि खासगी मालकीच्या कंपन्या यांना मुबलक कर्जपुरवठा होईल अशी मौद्रिक धोरणे चीनमध्ये राबवली गेली. जून २०२१ मध्ये चीनमधील सर्व कर्जाच्या बेरजेशी तेथील ठोकळ उत्पादनाचे गुणोत्तर ३०० टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।  
या मज सोडवा लवकरी ॥१॥  
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।  
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर?

## » राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांची धावाधाव सुरु

।मुलुंड। महाईन्यूज ।

**राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी ठाण्यातील नगरसेवकांची तातडीने बैठक बोलावली आहे. विधान भावनामध्ये या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नगरसेवक फुटीच्या पार्श्वभूमीवर या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदे गटाकडून राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना 1 ते 2 कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला होता. त्यांच्या या आरोपानंतर निष्ठावान कोण हे पाहण्यासाठी आजची बैठक बोलावण्यात आली होती.

जितेंद्र आव्हाड यांच्या या आरोपानंतर अजित पवार यांनी या नगरसेवकांची बैठक बोलावली आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना आपल्या पक्षात प्रवेश करण्यासाठी 1 ते 2 कोटींची ऑफर दिल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला या संपूर्ण प्रकरणाला गांभीर्याने घेत अजित पवार यांनी सर्व नगरसेवकांची एक बैठक घेतली. नगरसेवक फुटू नयेत किंवा ऑफरमुळे राष्ट्रवादीत फुट पडू नये यासाठी अजित पवार यांनी धावाधाव सुरु केली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, ठाण्यातील सर्व नगरसेवक, आमदार जितेंद्र आव्हाड राष्ट्रवादीसोबत सक्षमपणे उभे राहतील. मी आताच त्या बैठकीतून आलो. काही अडचण होईल असं मला वाटत नाही.

त्याचबरोबर जितेंद्र आव्हाड यांनी मला लवकरच अटक होणार असं सांगितल्यानंतर संपूर्ण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. तर या बैठकीत आव्हाड यांच्याशिवाय निवडणूक लढावी लागेल आणि जिंकावी लागेल. वेळ पडल्यास त्याच्याशिवाय तयारी करावी लागेल असं सांगण्यात आलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी गेलेले राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी त्यांना अटक होण्याची शक्यता असल्याचं म्हटलं आहे. ठाणे महानगरपालिका निवडणुका होईपर्यंत मला आतमध्ये ठेवलं जावू शकतं. केंद्रातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आपल्याला तसं सांगितलं असल्याचं आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर आव्हाडांनी हा दावा केला. जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले की, माझ्याविरोधात कुठलाही गुन्हा दाखल नाही. तरीही माझ्या अटकेचं षड्यंत्र सुरु आहे. ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या काळात जेलमध्ये ठेवलं जाऊ शकतं, असं ते म्हणाले. हिंदू जनआक्रोश मोर्चा निघाला खरा मात्र त्यासंबंधीचा कायदा आणण्यासाठी सरकारला कुणीही रोखलेलं नाही. हिंदू मुलींनाच धमक्या देणं योग्य नसल्याचं आव्हाड म्हणाले. सह्याद्री अतिथीगृहावर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यापूर्वी यांनी मला अटक होऊ शकते, असा दावा केला आहे.यावेळी बोलतांना आव्हाड म्हणाले की, राज्यावर सध्या साडेसहा लाखांपेक्षा जास्तीचं कर्ज आहे. त्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती बरी नाही. अशीच आर्थिक परिस्थिती राहिली तर राज्यात दिवाळखोरी येईल, अशी भीती त्यांनी बोलून दाखवली.

### राष्ट्रवादीत फुट पडू नये यासाठी...

**» जितेंद्र आव्हाड यांच्या या आरोपानंतर अजित पवार यांनी या नगरसेवकांची बैठक बोलावली आहे. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना आपल्या पक्षात प्रवेश करण्यासाठी 1 ते 2 कोटींची ऑफर दिल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला या संपूर्ण प्रकरणाला गांभीर्याने घेत अजित पवार यांनी सर्व नगरसेवकांची एक बैठक घेतली. नगरसेवक फुटू नयेत किंवा ऑफरमुळे राष्ट्रवादीत फुट पडू नये यासाठी अजित पवार यांनी धावाधाव सुरु केली आहे.**

# अर्थसंकल्प : मुंबईकरांबरोबरच देशातील शेतकऱ्यांच्याही तोंडाला पानं पुसली!

## » ठाकरे गटाने व्यक्त केली अर्थसंकल्पावरच नाराजी...

।नवी दिल्ली। महाईन्यूज।

**केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये मुंबईकरांबरोबरच कृषीप्रधान असलेल्या देशातील शेतकऱ्यांच्याही तोंडाला पानं पुसली आहेत. देशातील इतर शहरांपेक्षा आणि राज्यांपेक्षा मुंबई आणि महाराष्ट्रातून सगळ्यात जास्त रेव्हून्यू दिला जातो.**



### शेतकऱ्यांच्याही तोंडाला पानं पुसली

»केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये मुंबईकरांबरोबरच कृषीप्रधान असलेल्या देशातील शेतकऱ्यांच्याही तोंडाला पानं पुसली आहेत. देशातील इतर शहरांपेक्षा आणि राज्यांपेक्षा मुंबई आणि महाराष्ट्रातून सगळ्यात जास्त रेव्हून्यू दिला जातो. त्यामुळेच राज्यातील आणि मुंबईकरांकडून या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या.

केंद्र सरकारने आज देशाचा अर्थसंकल्प सादर करताना मध्यमवर्गीयांसह सगळ्यांना मोठं मोठी अश्वासन देण्यापलिकडे या अर्थसंकल्पाने काही केले नाही अशी टीका खासदार विनायक राऊत यांनी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा देशातील नागरिकांच्या तोंडाला पानं पुसणारा आहे अशी टीका त्यांनी केली आहे. पंतप्रधान नेरंद्र मोदी सातत्याने मुंबई दौऱ्यावर असतात.

त्यामुळे मुंबईच्या जनसामान्यांना हजारो कोटी रुपयांची झोळी भरून मुंबईला येतील असं वाटत होतं मात्र अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात मात्र मुंबईकरांच्या अपेक्षा झोळीला मिळवल्या असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार मुंबई दौऱ्यावर येत असतात, त्यामुळे प्रत्येक मुंबईकरांना या अर्थसंकल्पांमध्ये मुंबईसाठी एक विशेष पॅकेज असेल अशी अपेक्षा होती. मात्र तसे काही न होता, मुंबईकरांच्या अपेक्षा मोदी सरकारने धुळीस मिळवल्या असल्याची टीकाही ठाकरे गटाने केली आहे. केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये मुंबईकरांबरोबरच कृषीप्रधान असलेल्या देशातील शेतकऱ्यांच्याही तोंडाला पानं पुसली आहेत. देशातील इतर शहरांपेक्षा आणि राज्यांपेक्षा मुंबई आणि महाराष्ट्रातून सगळ्यात जास्त रेव्हून्यू दिला जातो. त्यामुळेच राज्यातील आणि मुंबईकरांकडून या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या.मात्र आता या मोदी सरकारने ना मुंबईला काही दिले आहे ना महाराष्ट्राला काही दिले आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पाकडून मुंबईकरांच्या कोणत्याही अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत असंही खासदार विनायक राऊत यांनी सांगितले.

# पारदर्शकता कशी हवी हे जगाला दाखवून दिलं

## » शिंदे गटाची अर्थसंकल्पावर स्तुतीसुमने

।मुंबई। महाईन्यूज।

केंद्रीय अर्थसंकल्प 2023-24 आज जाहीर झाला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी अर्थसंकल्प जाहीर करत अनेक घोषणा केला. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना दिलासा मिळाला आहे. या अर्थसंकल्पाचे एकनाथ शिंदे सरकारमधील मंत्री उदय सामंत यांनी तोंडभरून कौतुक केलं आहे.

उदय सामंत म्हणाले की, माझा मतदार संघ समुद्र किनाऱ्यावरील आहे. देशाच्या मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी सहा हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ३८ हजार ८०० शिक्षकांच्या भरतीची योजना आणली आहे. स्टार्टअपसाठी लघू आणि सुक्ष्म योजनेसाठी दोन हजार कोटींच्या कर्जवाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे. स्टील इंडस्ट्रीला लागणाऱ्या रॉ मटेरियलमध्ये सवलत देण्यात आली आहे. व्यवहारात पॅन कार्डला ओळखपत्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान मोबाईल आणि इलेक्ट्रीक गाड्यांच्या किंमती कमी करण्यात आल्या आहेत. याचा फायदा महाराष्ट्राला होणार आहे. महाराष्ट्रात लवकरच महिंद्रा आणि महिंद्राने १० हजार कोटींचा एसओयू केला, अशी माहिती सामंत यांनी दिली.





केंद्रीय
अर्थसंकल्प ₹
2023

# विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प!

**» सर्वसामान्यांना मोठा दिलासा » 7 लाखांपर्यंतच उत्पन्न करमुक्त » नव्या करप्रणालीला प्रोत्साहन**

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज २०२३-२४ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून होते, कारण मोदी सरकार २.० चा हा अखरेचा अर्थसंकल्प होता. त्यामुळे या अर्थसंकल्पातून सरकार गरीब, शेतकरी, मध्यमवर्गीय, व्यावसायिक इत्यादी समाजातील सर्वच घटकांना मोदी सरकार काय देणार, याची सर्वांना उत्सुकता होती. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. विरोधकांकडून यावर टीका सुरू आहे, तर सत्ताधाऱ्यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहेकेंद्रीय अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पाचं वर्णन कसं करता येईल? असा प्रश्न विचारण्यात आला तर अर्थसंकल्पातले तीन महत्त्वाचे मुद्दे मांडता येतील. व्यापक विकास धोरण समोर ठेवत हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अर्थव्यवस्थेतल्या खासगी क्षेत्राला उत्पादन क्षमतेत गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणं आणि त्याद्वारे नोकरीच्या संधी निर्माण करून विकासाला चालना देणं हे एक धोरण अर्थसंकल्पाच्याबाबतीत दिसून आलं.



## अर्थसंकल्पातील घोषणा

- » 157 वैद्यकीय महाविद्यालयांच्या स्थापनेसोबतच 157 नवीन नर्सिंग महाविद्यालयांची स्थापना केली जाणार आहे.
- » वैद्यकीय शिक्षणातील Multi-disciplinary अभ्यासासाठी साहित्याची व्यवस्था केली जाईल.
- » पुढील वर्षभरात शिक्षक प्रशिक्षणासाठी आधुनिक शिक्षक प्रशिक्षण केंद्रेही सुरू करण्यात येणार आहेत.
- » देशातील सर्वोच्च शैक्षणिक संस्थांमध्ये 3 ‘एक्सलन्स फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ केंद्रे उघडली जातील. यामध्ये
- » संशोधन आणि विकासासाठी खासगी खेळाडूंचा सहभाग घेतला जाणार आहे.
- » देशातील 740 एकलव्य मॉडेल निवासी शाळांसाठी पुढील 3 वर्षात 38 हजार शिक्षक आणि शिक्षकेतर पदांची भरती करण्यात येणार आहे.
- » मुलांसाठी आणि किशोरवयीन मुलांसाठी राष्ट्रीय डिजिटल लायब्ररीची स्थापना केली जाईल.
- » प्रधानमंत्री कौशल विकास योजना 4.0 पुढील 3 वर्षात सुरू केली जाईल.
- » युनिफाइड डिजिटल इंडिया प्लॅटफॉर्मच्या स्थापनेमुळे कौशल्य विकासाला गती मिळेल.
- » राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे.
- » 2023-24 या आर्थिक वर्षात आदिवासींसाठी विशेष शाळांसाठी सरकारने 15,000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.
- » नागरी सेवक आणि सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला जाईल.

## पंतप्रधान मोदी, अर्थमंत्री सीतारमण यांचे अभिनंदन : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



» अर्थसंकल्प सादर केल्यानंतर यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. विरोधकांकडून यावर टीका सुरू आहे, तर सत्ताधाऱ्यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहेकेंद्रीय अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्री सीतारमण यांचे अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणाले, “देशाच्या आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाला या अर्थसंकल्पाद्वारे चालना मिळणार आहे, त्यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे मनापासून अभिनंदन करतो.” याचबरोबर “रोजगारनिर्मिती, शेतकरी, कामगार, महिला, युवक अशा समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा हा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे, या अर्थसंकल्पाचे मी राज्याच्यावतीने मनापासून स्वागत करतो.” असंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहेत. याशिवाय “देशाच्या अमृतकाळातला पहिला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मांडला. हा अर्थसंकल्प गरीबांना आधार, मध्यमवर्गीयांना दिलासा, उद्योगांना उभारी तसेच पायाभूत सुविधांना उत्तेजन देणारा अर्थसंकल्प आहे.” अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

## या वस्तू होणार महाग

- » सोन्याचे दागिने
- » चांदीचे दागिने
- » प्लॅटिनम
- » सिगारेट
- » देशी किचन चिमणी देखील महागणार आहे.





## या वस्तू होणार स्वस्त-

- » मोबाईल फोन, एलईडी टीव्ही आणि कॅमेरा लेन्स
- » परदेशातून येणारी चांदी
- » बायोगॅसशी संबंधित उपकरणे
- » इलेक्ट्रिक कार, खेळणी आणि सायकल होणार स्वस्त



## पॅन कार्डबाबत मोठी घोषणा...

अर्थसंकल्पात अनेक घोषणा करण्यात आल्या. त्यात पॅन कार्ड विषयीही एक महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातला शेवटचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात विविध घोषणा आज निर्मला सीतारमण यांनी केल्या. सामान्यांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प ठरला आहे. पॅनकार्डला ओळखपत्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. सीतारमण यांनी ही घोषणा केली आहे. पॅनकार्डला ओळखपत्र म्हणून संपूर्ण देशात मान्यता देण्यात आली आहे. बजेट २०२३ यांनी पॅनकार्डला नवीन ओळख दिली आहे. आता ओळखपत्र म्हणून पॅनकार्डचा वापर नागरिक करू शकता. सीतारमण यांनी यामुळे पॅनकार्डला नवीन ओळख दिली आहे. टॅक्स स्लॅबमध्ये पहिल्यांदाच बदल करण्यात आला आहे. नव्या कर रचनेनुसार सात लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कर लागणार नसल्याचं निर्मला सीतारमण यांनी जाहीर केलं आहे.

## तुम्ही कुठे लक्ष द्याल

» जेव्हा तुम्ही आयकर वेबसाइटद्वारे आयकर भराल तेव्हा तुम्हाला जुन्या आणि नवीन कर प्रणालीमधून निवडलेली बॉय डिफॉल्ट नवीन व्यवस्था मिळेल. पूर्वी, जुन्या करप्रणातील डीफॉल्टनुसार निवडला जात असे. येथे तुम्हाला कर व्यवस्था निवडताना काळजी घ्यावी लागेल. जर तुमचे उत्पन्न 7 लाखांपेक्षा जास्त असेल आणि तुम्ही वेगवेगळ्या योजनांमध्ये गुंतवणूक करत असाल तर तुम्हाला जुनी कर व्यवस्था चालू ठेवावी लागेल. जर तुम्ही येथे निवडलेली नवीन कर व्यवस्था सोडली असेल, तर तुम्हाला ते भारी पडेल आणि कर भरावा लागेल.

# सोनाली कुलकर्णीची 'गुडन्यूज'




मराठी मनोरंजन विश्वामध्ये आपल्या अभिनयानं आणि सौंदर्यानं मराठी प्रेक्षकांना वेडं करणाऱ्या सोनालीची अदा नेहमीच प्रेक्षकांना घायाळ करत असते. आता सोनाली ही एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आली आहे. सोनालीच्या त्या गोड बातमीनं चाहत्यांनी तिच्यावर कौतूकाचा वर्षाव केला आहे.

सोनालीची ती बातमी व्हायरल होताच चाहत्यांनी तिला दिलेल्या प्रतिक्रियाही भलत्याच भन्नाट आहे. सोनालीचा चाहतावर्ग मोठा आहे. सोशल मीडियावर सोनाली ही नेहमीच चर्चेत असते. इंस्टावरही तिला फॉलो करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आता तर सोनालीच्या गुड न्युजच्या बातमीनं चाहत्यांना कमालीचा आनंद झाला आहे. तिची ती बातमी खरं म्हणायची की आणखी काही याची तिच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.

लॉकडाऊनमध्ये रजिस्टर मॅरेज केल्यानंतर मागील वर्षी सोनाली कुलकर्णीने कुणाल बेनोडेकरसोबत लंडनमध्ये धुमधडाक्यात लग्न केले. आता नुकतीच सोनाली कुलकर्णीने 'पटलं तर घ्या विथ जयंती' या टॉकशोमध्ये एक गुडन्यूज दिली आहे.

# सिद्धार्थ-कियाराने सुरु केली लग्नाची तयारी, अभिनेत्री करतेय लग्नाचे आउटफिट फायनल!

बी-टाऊनचे सर्वात प्रसिद्ध जोडपे सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी लवकरच लग्न करणार असल्याची चर्चा आहे. रिपोर्ट्सनुसार, हे कपल यावर्षी ६ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार आहे. या वृत्तांवर सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी या दोघांनीही मौन पाळले असले तरी आता या जोडप्याने त्यांच्या खास दिवसाची तयारी सुरू केल्याचे दिसते. 'शेरशाह' स्टार्स लवकरच त्यांच्या लग्नाची अधिकृत घोषणा करतील अशी अपेक्षा आहे. ताज्या बातम्यांनुसार, सिद्धार्थ मल्होत्रा सध्या त्याच्या कुटुंबासह त्याच्या होम टाऊन दिल्लीत आहे. मीडिया रिपोर्ट्सवर विश्वास ठेवला तर, मिशन मजनू स्टार त्याच्या लग्नाची तयारी करत आहे. त्याचवेळी, सिद्धार्थ मल्होत्रा त्याच्या लग्नासाठी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांसह दिल्लीहून राजस्थानला जाणार असल्याचेही काही वृत्तांतून कळले आहे. याबाबत अधिकृत माहिती नसली तरी.



# साजिद खानच्या चित्रपटात सौंदर्या शर्मा दाखवणार तिचे सौंदर्य



टीव्ही रिॲलिटी शो 'बिग बॉस सीझन 16' ची स्पर्धक सौंदर्या शर्मा सध्या खूप चर्चेत आहे. तिच्या सौंदर्य आणि ग्लॅमरमुळे सौंदर्याच्या हातात एक मोठा प्रोजेक्ट आला आहे. बिग बॉसच्या घरात आपल्या हॉट लूकमुळे प्रसिद्धीझोतात आलेली सौंदर्या लवकरच एका आयटम सॉंगमध्ये तिच्या सौंदर्याची झलक दाखवू शकते. सौंदर्या तिचा बिग बॉस सह-स्पर्धक साजिद खानच्या आगामी चित्रपटाचा एक भाग बनणार असल्याच्या बातम्या आहेत.

सौंदर्या शर्माने भलेही बिग बॉस जिंकले नसले तरी तिने तिच्या चाहत्यांच्या हृदयात खास स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावरही ही अभिनेत्री खूप लोकप्रिय आहे. सलमान खानने होस्ट केलेल्या शोमध्ये सौंदर्या तिच्या अप्रतिम व्यक्तिमत्त्वामुळे खूप लोकप्रिय झाली आहे. शो सोडल्यानंतर सौंदर्याला काही मनोरंजक प्रोजेक्ट मिळाले आहेत. वृत्तानुसार, साजिद खानच्या आगामी चित्रपटातील एका आयटम सॉंगसाठी सौंदर्याला अप्रोच करण्यात आले आहे.

# 'पाळणा कधी हलणार..'



अभिनेता वरुण धवन त्याच्या 'सिटाडेल' या वेब सीरिजमुळं चर्चेत आहे. या सिरिजची शूटिंगही सुरू झाली असून वेब सीरिजमधील अभिनेता वरुण धवनचा फर्स्ट लूक शेअर करण्यात आला आहे. वरुण नुकताच एका कार्यक्रमात आलिया भट्टसोबत दिसला. यावेळी पापराझींनी त्याला एक प्रश्न विचारला आणि त्यानंतर वरुणच्या उत्तरानं आता एकच चर्चा रंगली आहे. याविषयी पापाराझींनी वरुणला त्याच्या कुटुंब नियोजनाबाबत प्रश्न विचारला. यावर वरुण धवनने मजेशीर उत्तर दिले. पापाराझींनी वरुणला विचारले की, 'तो फॅमिली प्लॅनिंग केव्हा करत आहे'. यावर वरुणने सांगितले की, "आलिया आई झाली तु बाबा झालास तर काय सगळ्यांनीच... मी माझ्या बायकोला विचारतो. तिला सांगतो की त्यांनी तसं सांगितलं आहे".

हे ऐकून तिथे उपस्थित सर्व लोक हसू लागले. याशिवाय या कार्यक्रमात आलियाने तिच्या करिअरबद्दल आणि मुलीबद्दलही मोकळ्या गप्पा मारल्या.

वरूण आणि नताशानं 24 जानेवारी 2021 रोजी लग्न केलं. वरुण आणि नताशानं गेल्यावर्षी अलिबागमध्ये कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत लग्न केलं होतं. मनोरंजन विश्वात अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी चाहत्यांना गूड न्यूज देत आहेत. आलिया-रणबीर, देबिना-गुरमीत आणि बिपाशा-करण यांच्या घरी परीचं स्वागत करण्यात आलं आहे. अशातच अणि नताशा यांच्या घरी पाळणा हलणार अशी चर्चा रंगली होती. मात्र वरुण आणि नताशाने या सर्व अफवा असल्याचं सांगितलं होतं. मात्र वरुणचे चाहते ही गूडन्यूज ऐकण्यासाठी उत्सुक आहेत.

# मनोरंजनाच्या वाट्याला भोपळा! अशोक पंडित चिडले, आमची काळजी कुणालाच नाही

1 फेब्रुवारी 2023 रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बजेट सादर केला. या बजेटमध्ये चित्रपटाची तिकिटे आणि ओटीटी सबस्क्रिप्शनबाबत मनोरंजन उद्योगालाही काही दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती, पण तसं काही झालं नसल्याने चित्रपटप्रेमींची नाराजी दिसत आहे.

याबाबत आता चित्रपट निर्माते अशोक पंडित यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपट इंडस्ट्रीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी भारत सरकारवर टिका आहे. 'एएनआय' या वृत्तसंस्थेशी बजेटबद्दल बोलताना



चित्रपट निर्माते अशोक पंडित म्हणाले, 'आपली इंडस्ट्री देशातील सर्वात मोठा करदाता आहे. चित्रपट उद्योग दरवर्षी सर्वाधिक कर भरतो, पण आपल्या मनोरंजन उद्योगाकडे सर्वच सरकारांचे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. हे दुर्दैव आहे.'

अर्थसंकल्पात इतर उद्योगांबद्दल ज्याप्रकारे बोलले गेले आहे, मग ते वस्त्रोद्योग असो, साबण उद्योग असो की आरोग्य उद्योग असो, मात्र इंडस्ट्रीबद्दल काहीही बोललं जातं नाही.'

फिल्म अँड टेलिव्हिजन डायरेक्टर्स असोसिएशन अध्यक्ष, अशोक पंडित पुढे म्हणतात, 'ज्या प्रकारे इतर उद्योग ओळखले जातात आणि त्यावर चर्चा केली जाते. त्या उद्योगाच्या फायद्यांचा विचार केला जातो. मात्र आमच्या मनोरंजन उद्योगाबद्दल कसं काहीच घडत नाही. हा उद्योग कसा वाचवायचा, कसा वाढवायचा, याचा कुणीच विचार करत नाही. कोव्हिड-19 महामारीच्या काळातही आम्ही घरात बसून लोकांचे मनोरंजन केले आहे.'

मिळालेल्या माहितीनुसार, सिंगल स्क्रीन थिएटर्स आणि मल्टिप्लेक्सच्या तिकीट दरात मोठी तफावत आहे. त्याचप्रमाणे, जर आपण OTT प्लॅटफॉर्मबद्दल बोललो, तर त्याचा सबस्क्रिप्शन दर देखील खूप जास्त आहे. हे जर कमी झाले तर जास्तीत जास्त लोक चित्रपटांकडे खेचले जातील आणि सर्वांना त्याचा फायदा होईल. मात्र, या अपेक्षाही अर्थसंकल्पाने नाराज केलं आहे.

# शुबमनचे शतक-हार्दिकचा जलवा!

## भारताने न्यूझीलंडचा 168 धावांनी उडवला धुव्वा, मालिका 2-1ने खिशात

। अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेतील अंतिम सामना जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडवर १६८ धावांनी मात करताना ऐतिहासिक विजय नोंदवला. या सामन्यात भारतीय संघाने प्रथम २० षटकात ४ गडी गमावून शुबमनच्या (१२६*) शतकाच्या जोरावर २३४ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर न्यूझीलंड २३५ धावांचे लक्ष्ये दिले होते. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा डाव १२.१ षटकांत ६६ धावांवर आटोपला. त्यामुळे भारतीय संघाने २-१अशा फरकाने मालिका आपल्या नावावर केली.**

तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा १६८ धावांनी पराभव करताना एक मोठा विक्रम केला आहे. टीम इंडियाचा टी-२० इतिहासातील हा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी २०१८ मध्ये त्याने आयर्लंडचा १४८ धावांनी पराभव केला होता. दुसरीकडे, न्यूझीलंडचा हा टी-२० इतिहासातील सर्वात मोठा पराभव आहे. यापूर्वी २०१० मध्ये पाकिस्तानने त्याचा १०३ धावांनी पराभव केला होता.२३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ १२.१ षटकांत ६६ धावांवर सर्वबाद झाला.



न्यूझीलंडकडून डॅरिल मिचेलने सर्वाधिक धावा केल्या. त्याने २५ चेंडूत ३५ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर कर्णधार मिचेल सँटनरने १३ धावांचे योगदान. या दोघां व्यतिरिक्त न्यूझीलंडच्या एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना कर्णधार हार्दिक पांड्याने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर अर्शदीप सिंग, उमरान मलिक आणि शिवम मावी या वेगवान गोलंदाजी त्रिकुटाने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. ज्यामुळे न्यूझीलंड संघाच्या फलंदाजीचे कंबरडे मोडणे सेपे झाले.

तत्पुर्वी या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. इशान किशनच्या रूपाने भारताला सुरुवातीचा पहिला धक्का बसला, मात्र त्यानंतर शुबमन गिल आणि राहुल त्रिपाठी यांनी पॉवरप्लेमध्ये दमदार खेळ दाखवला. पॉवरप्लेमध्ये भारताने १ गडी गमावून ५८ धावा केल्या होत्या. राहुल त्रिपाठी ४४ (२२) धावांची धडाकेबाज खेळी खेळून बाद झाला. सूर्यानेही वेगवान खेळी खेळली.

त्याच वेळी, शुबमन गिलने त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. त्याने शुबमन गिलच्या (६३ चेंडूत नाबाद १२६) झंझावाती शतकी खेळी केली. त्याचबरोबर त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे. त्याने टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या नोंदवली. शुबमन गिलने सर्वाधिक नाबाद १२६ धावा केल्या. त्याने ६३ चेंडूंच्या खेळीत १२ चौकार आणि ७ षटकार मारले. त्याचा स्ट्राइक रेट २००.०० होता. गिलच्या कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांनंतर आता टी-२० मध्येही शतक झळकावले आहे.

# विश्वविजेत्या शफाली वर्माच्या संघाचा क्रिकेटच्या देवाकडून झाला गुणगौरव

## अहमदाबादच्या स्टेडीयमवर रंगला कौतुक सोहळा

।ऑस्ट्रेलिया। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जगातील क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा भारताचा माजी दिग्गज सचिन तेंडुलकर आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) अधिकाऱ्यांनी अहमदाबादमध्ये रविवारी पहिल्या ICC अंडर-१९ महिला क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाला ५ कोटी रुपयांचा चेक प्रदान करत त्यांचा गुणगौरव करण्यात आला. दक्षिण आफ्रिकेतील टी२० विश्वचषक विजयी संघाला यावेळी मास्टर-ब्लास्टरने प्रेरणादायी असे भाषण दिले. पॉचेफस्ट्रूममध्ये शफाली वर्माच्या संघाने विजेतेपदाच्या सामन्यात इंग्लंडला अवघ्या ६८ धावांत गुंडाळले आणि त्यानंतर लक्ष्याचा सहज पाठलाग करत विश्वचषकावर नाव कोरले.

भारत विरुद्ध न्यूझीलंड च्या तिसऱ्या टी२० सामन्याआधी हा सत्कार समारंभ आयोजित केला होता. यासाठी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर सोबत बीसीसीआयचे सचिव जय शाह, खजिनदार आशिष शेलार आणि आयपीएल गव्हर्निंग राजीव शुक्ला उपस्थित होते. सचिनने आपल्या भाषणाच्या सुरुवातीला 'केम छो अहमदाबाद, मजामा' असे म्हणत सर्वांचे स्वागत केले.विशेष म्हणजे रणजी ट्रॉफीचे सामने जोधपूरमध्ये खेळवण्यात आले आहेत. वर्षांनंतर हे दिसून आले आहे. स्टेडियमचे नूतनीकरण झाल्यानंतर हा प्रकार घडला. रणजी करंडकापूर्वी, निवृत्त क्रिकेटपटूंची लीग असलेल्या लीजेंड्स लीग क्रिकेटचे काही सामनेही येथे झाले. आंतरराष्ट्रीय सामन्यांबद्दल बोलायचे झाले तर २० वर्षांपासून येथे एकही सामना झालेला नाही. २००२ मध्ये जोधपूर येथे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात एकदिवसीय सामना खेळला गेला. त्यावेळी वेस्ट इंडिज संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता.अंडर-१९ महिला संघाचे कौतुक करताना सचिन म्हणाला, " वयाच्या १०व्या वर्षी १९८३ साली कपिल देव यांना विश्वचषक जिंकताना मी हे स्वप्न पहिले होते. जे २०११ साली पूर्ण होताना पहिले आज १२ वर्षांनंतर तुमच्या रुपात मी ते पुन्हा जगलो.




### पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!- सचिन तेंडूलकर

**समान संधी बाबत बोलताना सचिन तेंडूलकर म्हणतो, " मी महिला आणि पुरुष दोन्ही प्रकारच्या क्रिकेटपटूना समान संधी मिळण्याबाबत आग्रही असतो. त्यामुळे पुरुषांबरोबरच तुम्ही जिंकलेल्या विश्वचषकाचे देखील तितकेच कौतुक होत आहे. बीसीसीआय आणि इथे उपस्थित सर्व मान्यवरांनी कायम प्रोत्साहन दिले होते आणि यापुढे देखील देत राहतील. अशीच कामगिरी करत रहा. तुम्हाला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!" या सोहळ्यानंतर अंडर-१९ विश्वचषकाचा विजयी महिला संघ व इतर मान्यवर तिसऱ्या टी२० चा आनंद घेण्यासाठी स्टेडीयममध्ये बसलेले आहेत.**

# ठाण्यात होणार महिला आयपीएल स्पर्धेचा लिलाव?

## दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह व्यवस्थापनाकडे एमसीएकडून विचारणा

।ठाणे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

महापालिकेच्या दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहामध्ये तब्बल २५ वर्षानंतर विजय हजारे रणजी क्रिकेट सामने खेळविण्याबरोबरच आयपीएलचा सराव करण्यात आलेले असतानाच, त्यापाठोपाठ आता याच मैदानात पहिल्यांदाच होणाऱ्या महिला आयपीएल स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव कार्यक्रम होण्याची चिन्हे आहेत. या कार्यक्रमासाठी क्रीडा प्रेक्षागृहाच्या व्यवस्थापनाकडे एमसीएकडून विचारणा करण्यात आली असून त्यात त्यांनी १५ ते २० फेब्रुवारीदरम्यान मैदान राखीव ठेवण्याबाबत प्राथमिक चर्चा केल्याची माहिती पालिका सुत्रांनी दिली.

ठाणे महापालिकेच्या दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहातील खेळपट्टी बीसीसीआयच्या नियमावलीनुसार नव्हती. यामुळे येथे रणजी तसेच इतर क्रीकेट सामने होत नसल्याने क्रीडा प्रेक्षागृहाची पांढरा हत्ती अशी ओळख निर्माण झाली होती.

ही ओळख पुसण्यासाठी पालिका प्रशासनाकडून गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न सुरु होते. त्याचाच एक भाग म्हणून नामवंत क्युरेटर नदिम मेमन यांच्या देखरेखीखाली पालिकेने आंतरराष्ट्रीय दर्जाची खेळपट्टी काही वर्षांपुर्वी तयार केली. बीसीसीआयच्या नियमावलीनुसार ही खेळपट्टी तयार करण्यात आल्यामुळे या मैदानावर तब्बल २५ वर्षानंतर विजय हजारे रणजी क्रिकेट सामने पार पडले.

